# प्रकरण पहिले

## विषय प्रवेश

## भारतातील जातिव्यवस्था: काही वैशिष्ट्ये

## प्रकरण पहिले

## भारतातील जातिव्यवस्था: काही वैशिष्टये

व्यक्तीजीवनावर परिणाम करणारे जात, धर्म, वंश, भाषा, प्रदेश असे अनेक घटक आहेत. त्यापैकी "जाती" हा घटक भारतीय समाजरचनेतील अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. जातिव्यवस्था व वर्णव्यवस्था ही भारतीय समाजरचनेची जुनी वैशिष्टये आहेत. जाती व वर्णव्यवस्था परस्परांवर आधारित आहेत. किंबहुना जातिसंस्थेचे मूळ वर्णव्यवस्थेत आहे असे मानले जाते. अशी ही तीन हजार वर्षांपासून स्थिरावलेली हिंदू समाजाची रचना म्हणजेच जातिसंस्था होय. उच्च, नीच, श्रेष्ठ व कनिष्ठ अशा श्रेणींनी स्थिर स्वरूपात बनलेली ही समाजरचना आहे. ही प्रत्येक श्रेणी "वर्ण" किंवा "जात" या संज्ञेने निर्दिष्ट केली जाते.[१] हिंदू धर्मशास्त्राने पवित्र मानलेल्या रूढींनी हा उच्च-नीच भाव ठरतो. धार्मिक दृष्टीने व पवित्र रूढींच्या दृष्टीने भिन्न-भिन्न जातींचे आर्थिक, राजकीय व अन्य प्रकारचे सामाजिक व्यवहार ठरत असतात.

उच्चनीच श्रेणीबध्द जातिसंस्थेमध्ये जातींचे परस्परावलंबित्वाचे दृढ संबंध असतात. ही संस्था आधुनिक अर्थाने सांस्कृतिक आहे. वंशवादी नव्हे.[२] म्हणजे भिन्न भिन्न जाती म्हणजे भिन्न भिन्न वंश नव्हे. समान शारिरीक वंश परन्तु जाती भिन्न. उलट जात एकच परन्तु त्यातील गट व व्यक्ती भिन्न शारिरीक वंशाच्या अशी स्थिती जातिसंस्थेमध्ये दिसते. अशी जातिसंस्था हा भारतीय समाजरचनेचा अत्यंत क्लिष्ट व गुंतागुंतीचा प्रकार आहे. त्यामुळे तिचा उगम, विकास स्पष्ट करणे अतिशय अवघड आहे. जातिसंस्थेची निर्मिती वेदकालाच्या अंतिम कालखंडात झाली असे मानले जाते. वेद, उपनिषदे, मनुस्मृति, रामायण, महाभारत यासारखी महाकाव्ये यात जातींच्या उत्पत्तीसंबंधी उल्लेख सापडतात. जातींच्या उत्पत्तीसंबंधी सर्वात प्राचीन आधार ऋग्वेदातील पुरूषसूक्तात आढळतो.

ब्राम्हणोऽस्य मुखमासीद् बाहु राज्यन्य: कृत: ।
उरूस्तदस्य यद् वैश्य: पद्भ्यां शूद्रोऽजायत ।।[3]

ऋग्वेदातील वरील ऋचेत तसेच मनुस्मृतीतही समाजपुरुषाच्या मुखातून ब्राह्मण, बाहूमधून क्षत्रिय, उरूयातून वैश्य व पायांमधून शूद्र वर्णांची निर्मिती झाली आहे, असा उल्लेख आढळतो. ऋग्वेदात या चार वर्णांच्या कर्तव्यांचा उल्लेख केलेला आहे. ब्राह्मण वर्णांकडे वेदविद्या ग्रहणाचे कार्य, क्षत्रियांकडे संरक्षणाचे कार्य, वैश्याकडे शेती व व्यापाराचे कार्य तर क्षुद्रांकडे त्रैवर्णिकांच्या सेवेचे कार्य होते. या चातुर्वर्ण्य व्यवस्थेतून शेकडो जाती, उपजाती व पोटजाती निर्माण झालेल्या आहेत. मूळ चार वर्णांच्या संकरातून इतर जातींची निर्मिती झाली आहे. असा उल्लेख मनुस्मृतीत आढळतो. त्याकाळी समाजात प्रचलित असणाऱ्या अनुलोम व प्रतिलोम विवाहातून म्हणजे वर्णसंकरातून अनेक जाती निर्माण झाल्या व वर्णपध्दतीनुसार त्यांच्यात श्रमविभागणी करण्यात आली. अशाप्रकारे मनुच्या काळात हिंदू समाजाची जातिसंस्थेच्या आधारावर निश्चित अशी स्तररचना निर्माण झाली. कालांतराने ती दृढ झाली. विकास पावत गेली व ती भारतीय समाजरचनेचे वैशिष्टय बनली.

जातिसंस्था ही प्राचीन भारतीय संस्कृती टिकवण्याच्या विशिष्ठ प्रयत्नांचे व्यक्त स्वरूप आहे. त्यामुळे व्यक्तीचे दैनंदिन जीवन, सामाजिक स्थान, दर्जा, प्रतिष्ठा तसेच तिचा व्यवसाय या सर्वांवर जातीचा मोठा प्रभाव आहे. जातिसंस्थेमुळे प्रत्येक जातीतील व्यक्तीच्या स्वातंत्र्यास व नैसर्गिक महत्त्वाकांक्षेस मर्यादा पडल्या. जातिसंस्थेमुळे हिन्दू समाजात काही दोष निर्माण होऊन ते टिकून राहिले व त्यामुळे समाज दुर्बल झाला. परकीय आक्रमणांना तोंड देण्याइतके राजकीय व आर्थिक सामर्थ्य समाजामध्ये निर्माण झाले नाही. प्रगतीचा वेग मंद राहिला. परन्तु अतिदीर्घकाळ टिकून रहाण्याचे सामर्थ्य मात्र निर्माण झाले.

व्यक्तीचे दैनंदिन जीवन, सामाजिक स्थान, प्रतिष्ठा तसेच तिचा व्यवसाय या सर्वांवर जातिसंस्थेचा प्रभाव आढळतो. जातिसंस्थेच्या स्वरूपात व प्रभावात परिस्थितीनुसार तसेच प्रादेशिक घटकानुसार थोडाफार फरक झाला असला तरी तिच्या पारंपारिक वैशिष्ठयांमध्ये फारसा फरक पडलेला नाही. वेदकाळात अस्तित्त्वात असलेल्या चातुर्वर्ण्य व्यवस्थेतून हजारो जाती व उपजाती निर्माण झालेल्या आहेत. एनसायक्लोपीडिया ऑफ ब्रिटानिका-नुसार भारतात तीन हजार जाती व पंचवीस हजार उपजाती आहेत. अशा प्रकारे आज असंख्य जाती अस्तित्त्वात असल्या तरी या सर्व जातींच्या वैशिष्ठयांमध्ये आश्चर्यकारक साम्य आढळून येते. स्थूलमानाने जातिसंस्थेची वैशिष्ठये पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

१) भारतीय समाजाची विभागणी अनेक जातीत झालेली आहे. प्रत्येक जातीला सामाजिक दर्जानुसार विशिष्ठ व्यवसाय व स्थान प्राप्त होते. तसेच प्रत्येक व्यक्तीची जात धर्मानुसार ठरते. तिचा व्यवसाय जातीनुसार ठरतो. जातिव्यवस्था खुली किंवा लवचिक नसून बंदिस्त आहे. जातीचे सभासदत्त्व ऐच्छिक नाही. सामान्यपणे व्यक्ती ज्या जाती जन्मते त्याच जातीत मरते. तिला दुसऱ्या जातीचे सभासदत्त्व स्वीकारता येत नाही.

२) सर्व जातींचा सामाजिक दर्जा, स्थान व प्रतिष्ठा समान नाही. जाती-जातीत श्रेष्ठ-कनिष्ठ अशी श्रेणीबध्द रचना आढळते. या रचनेनुसार जातींमधील परस्पर व्यवहाराविषयीचे आणि श्रेष्ठत्त्वाविषयीचे नियम संकेताच्या स्वरूपात रूढ झालेले आहेत. प्रत्येक जात दुसऱ्या जातीपेक्षा आपली जात श्रेष्ठ मानते. जाती, उपजाती व पोटजातींमध्ये परस्पर श्रेष्ठत्त्वाबाबत स्पर्धा आढळते.

३) जन्मजात जातिभेदाची व श्रेष्ठ-कनिष्ठत्त्वाची कल्पना रूढ असल्यामुळे कांही जातींना इतर जातींपेक्षा विशेष अधिकार प्राप्त झाले

आहेत. तर कांही जाती नैसर्गिक हक्कांपासून वंचित राहिल्या आहेत. खालच्या जातींना हक्क नाकारून त्यांच्यावर कर्तव्य पार पाडण्याची सक्ती करण्यात आली आहे. अशा प्रकारे सामाजिक हक्कांच्या बाबतीत मोठ्या प्रमाणात अन्यायकारक विषमता आढळून येते.

४) व्यक्तीचे सामाजिक जीवन व दैनंदिन व्यवहार जातिनियमांनुसार नियंत्रित केले जातात. सामाजिक संबंधाविषयीचे नियम प्रत्येक जातीनुसार भिन्न असतात. आणि त्या नियमांचे सामाजिक व्यवहारावर संपूर्ण नियंत्रण असते. जातिनियमांनुसार अस्पृश्य जातीच्या लोकांना देवळे, पाणवठे, सार्वजनिक ठिकाणे वापरण्यास प्रतिबंध होता. या नियमांचे उल्लंघन करणे हा अपराध समजला जाई.

५) प्रत्येक व्यक्तीची जात जन्मानुसार ठरते तर तिचा व्यवसाय जातीनुसार ठरतो. गुण कौशल्य व इच्छा यानुसार व्यवसाय निवडण्याचे स्वातंत्र्य व्यक्तीला नाही. कृतिस्वातंत्र्य व व्यवसायस्वातंत्र्यावर जातिसंस्थेचे संपूर्ण नियंत्रण आहे.

६) व्यवसायनिवडीच्या प्रतिबंधाप्रमाणेच विवाहपद्धतीवरही जातिसंस्थेचे नियंत्रण आहे. प्रत्येक जात जात्यंतर्गत विवाहाच्या नियमाने परिबद्ध आहे. सर्व जाती व उपजातीत हे वैशिष्ट्य प्रकर्षाने आढळून येते. जात्यंतर्गत विवाहाची रूढी हे जातिव्यवस्थेचे प्रमुख वैशिष्ट्ये आहे. पूर्वी जातिजातिमधील परस्पर बेटी व्यवहार निषिद्ध मानला जाई. आणि या रूढीचे पालन न करणाऱ्या व्यक्तीला जातिपंचायतीकडून जातिबहिष्काराचे कठोर शासन दिले जाई.

जातिसंस्थेच्या वरील वैशिष्ट्यांचा विचार केल्यास असे लक्षात येते की, जातीची रचना सामाजिक विषमतेच्या व शोषणाच्या पायावर उभी

आहे. ब्राह्मण जातीसारख्या कांही उच्च जातींना विशेष अधिकार प्राप्त झाले. याउलट अस्पृश्य जाती अगदी मूलभूत स्वत्वाच्या हक्कांपासून दूर राहिल्या. विद्याग्रहण व द्रव्यप्राप्ती हे अधिकार उच्च जातींपुरते मर्यादित होते. त्याचा उपयोग त्यांनी आपले स्थान बळकट बनवण्यासाठी आणि शूद्र जातींवर वर्चस्व ठेवण्यासाठी केला. उच्च जातींनी धर्मशास्त्रांचा व वचनांचा अर्थ आपल्या सोयीनुसार लावून शूद्र जातींचे जीवन पशुवत् बनवले. जाती-जातींमध्ये सामाजिक अभिसरणाची क्रिया अत्यंत मर्यादित असल्यामुळे त्यांच्यात भावनिक बांधिलकी निर्माण होऊ शकली नाही. परिणामी परस्पर दुराव्याची दरी सातत्याने वाढत गेली आणि जातिव्यवस्थेच्या विकृतेचे दुष्परिणाम व्यक्ती-जीवनावर व समाजजीवनावर होऊ लागले.

थोडक्यात् वेद व तत्सम धर्मग्रंथात चातुर्वर्ण्य व्यवस्थेची व त्यावर आधारलेली जातिव्यवस्थेची मूळे आढळतात. परन्तु त्यानंतरच्या काळात जातिबंधने हळूहळू शिथिल बनत गेली. मात्र जातिभेद नष्ट झाला नाही. प्राचीन धर्मग्रंथामध्ये वर्णव्यवस्था व प्रत्येक वर्णाची वृत्ती यांचा उल्लेख असला तरी संपूर्ण समाजाचे विभाजन या चार वर्णांच्या व्यवस्थेत होऊन प्रत्येक मनुष्य आपल्या वर्णाचा शास्त्रसंमत व्यवसाय करीत असे, असे आढळत नाही. परन्तु जरी या वर्णांना शास्त्राने निरनिराळी कामे लावून दिलेली होती तरी त्या त्या वर्णातील लोक केवळ शास्त्रानेच लावून दिलेली कामे करीत असत असे समजणे हा भ्रम आहे. खुद्द वेदकाळात वेदविद्येशिवाय सत्तावीस प्रकारचे धंदे ब्राह्मण लोक करीत असत.[४] त्यानंतरच्या काळात लोकसंख्या वाढत गेली. प्राचीन वर्णव्यवस्थेतील चाकोरीबद्ध व्यवसाय वाढत्या संख्याबळासाठी अपुरे पडू लागले आणि काही जण आपल्या व्यवसायाच्या आसपासची कामे करू लागले. त्या त्या वर्णातील मोठा गट जरी लावून दिलेले व्यवसाय किंवा तत्सम धंदे करीत असला तरी त्या प्रत्येक वर्णातून धंद्यासाठी अनेक लोक बाजूला सरकत होते.[५] बाजूला निघालेल्या लोकांनी आपल्या वर्णाच्या

आसपासची कामे निवडली. उदा. ब्राह्मणांनी सरकार दरबारी दप्तर, हिशोब, नोंदी ठेवणे, कारकुनी करणे, कर गोळा करणे अशा कामांना सुरुवात केली. क्षत्रिय व वैश्यांनी देखील जमेल तो व्यवसाय निवडून आपली सुटका करून घेतली. तरी या त्रैवर्णिकांच्या मनातून सनातन वर्णव्यवस्था हद्दपार झाली नाही. त्यामुळे शूद्र व अतिशूद्र यांना त्यांच्या जन्मजात व्यवसायापासून सोडवणूक मिळाली नाही.[६] तीन वर्णांपुरती व्यवसायबंदी अशी तुटली नसली तरी शिथिल झाली. परन्तु सर्वच वर्ण बेटीबंदीच्या बंधनात परिबद्ध होते. कालांतराने या वर्णव्यवस्थेतून हळूहळू पण निश्चितपणे जातिव्यवस्था निर्माण झाली व स्थिरावली.

या प्रकारची जातिव्यवस्था भारतात तीन हजार वर्षांपासून रूढ होती आणि या देशात कितीही मोठे राजकीय बदल झाले तरी जातिव्यवस्थेचा समाजावरील पगडा कायम राहिला. भारतीय समाज विविध जातींमध्ये विखुरला गेल्यामुळे मध्य आशिया व अफगाणिस्थानातून आलेल्या मूठभर मुसलमान आक्रमकांनी हिंदूंचा पराभव केला आणि हळूहळू सर्व भारतभर आपले वर्चस्व प्रस्थापित केले. या धार्मिक आक्रमणांच्या काळात कनिष्ठ जातींनी मोठया प्रमाणात मुसलमान धर्माचा स्वीकार केला. परन्तु त्यामुळे जातिबद्ध हिंदू समाजात फारसा बदल झाला नाही. उलट जातिसंस्था संरक्षक व जास्त ताठर बनली. उच्च जातींचे वर्चस्व वाढले. त्यातून जातिसंस्थेच्या तत्त्वज्ञानाला विरोध करणारा भक्तीमार्ग उदयास आला. नामदेव, ज्ञानेश्वर, एकनाथ, बसवेश्वर, रामानुजाचार्य, गुरु गोरखनाथ, गुरुनानक, कबीर, रोहिदास वगैरे संतांनी भक्तीमार्गाचा प्रसार केला. ज्ञानेश्वरांनी स्त्री शूद्रांस ज्ञानापासून वंचित केल्याबद्दल वेदावर टीका करून म्हटले आहे की,

"म्हणोनि हे कुल जाती वर्ण । अवघेचि गा अकारण ।"

परन्तु संतांनी आध्यात्मिक पातळीवरून जातिव्यवस्थेला केलेला विरोध सुधारणा घडवून आणू शकला नाही.[७] कारण संतांचा समतावादी विचार प्रत्यक्षात

येण्यासाठी जी भौतिक प्रगती आवश्यक असते ती झालेली नव्हती. भारतीय समाज हा जातिनिष्ठ सरंजामशाहीच्या जोखडात सापडला होता.[८] या समाजाच्या मूळ भौतिक पायात बदल झाल्याशिवाय त्यात बदल होणार नव्हता. या बदलाला सुरुवात १९व्या शतकात या देशात इंग्रजांचे राज्य स्थापन झाल्यावर आणि इंग्रजी सत्ता स्थिरावल्यावर झाली.

२) इंग्रजी राज्याची स्थापना: त्याचे जातिव्यवस्थेवरील परिणाम:

ब्रिटीश राजवट भारतात स्थिर झाली त्यावेळी भारतातील खालच्या जातींची स्थिती अत्यंत दयनीय होती. पराकोटीचे अज्ञान, अंधश्रध्दा, देवभोळेपणा, प्रयत्नवादापेक्षा दैववादाला शरण जाण्याची प्रवृत्ती, धार्मिक रूढींचा पगडा यामुळे समाज गतीहीन बनला होता. अज्ञान व अंधश्रध्देमुळे समाजाची स्वतंत्र प्रज्ञा व विचारशक्ती नष्ट झाली होती. जुनी सरंजामशाही समाजरचना पूर्णत: नासलेली होती आणि त्यातून बाहेर कसे पडायचे याचा मार्ग लोकांना सापडत नव्हता. ब्रिटीश राज्यकर्ते भारतात आले आणि या स्थितीत हळूहळू बदल होऊ लागला. ब्रिटीशांनी भारतात राज्य स्थापन करून नव्या विचारांना, परिवर्तनाला सुरुवात केली. ब्रिटीश राजवटीचे परिणाम व्यक्तीजीवनावरही होऊ लागले. इंग्रजी अंमलामुळे दोन भिन्न संस्कृतीत वाढलेल्या दोन समाजांचा निकट परिचय झाला. इंग्रज हे राज्यकर्ते असल्यामुळे साहजिकच समाजावर पाश्चात्य संस्कृती व शिक्षण यांचे दूरगामी परिणाम झाले.[९] सामाजिक व धार्मिक क्षेत्रेही याला अपवाद नव्हते. या क्षेत्रांवरही परिणाम होऊन अनेक स्थित्यंतरे घडून आली. ही स्थित्यंतरे आश्चर्यकारक तसेच परिणामकारकही होती.

ब्रिटीश राजवटीचे जातिव्यवस्थेवरही परिणाम घडून आले. वस्तुत: ब्रिटीशपूर्वकाळात जाती व वर्णव्यवस्थेविरूध्द अनेक प्रयत्न झाले.

परंतु ब्रिटीशांच्या काळात या प्रयत्नांना नवा दृष्टीकोन प्राप्त झाला. खऱ्या अर्थाने ब्रिटीशांच्या काळात जातिव्यवस्थेचा पुनर्विचार करण्याच्या प्रयत्नांना विशेष चालना मिळाली. ब्रिटीशाबरोबर भारतात आलेल्या नव्या विचारांमुळे भारतीय समाज जागृत होऊ लागला. व्यक्तीस्वातंत्र्य उदारमतवाद, मानवतावाद या पाश्चात्य वैचारिक मूल्यांनी भारतीयांना त्यांच्या हक्कांची जाणीव करुन दिली. ब्रिटीश राज्याची स्थापना भारतात झाली. व नव्या शिक्षण पध्दतीचा पाया घातला गेला. इंग्रजी शिक्षणपध्दतीमुळे परंपरागत भारतीय संस्कृतीच्या जीवनमूल्यांची समीक्षा करणारी नवी सुशिक्षितांची पिढी समाजात निर्माण झाली. पाश्चात्य संस्कृती व शिक्षण यांच्या प्रभावामुळे संकुचित व आत्मनिष्ठ विचारांची जागा समग्र परिवर्तनाच्या जाणीवेने घेतली. नव्या ज्ञानामुळे भारतीयांना आपल्यातील दोषांची व उणीवांची जाणीव झाली. आत्मपरिक्षणातून पारंपारिक भारतीय जीवनाचे विकृत स्वरुप उघडे झाले आणि जीवनाला विकृती प्राप्त करुन देणाऱ्या प्रथांचा, रुढींचा शोध घेण्याचे प्रयत्न सुरु झाले.

या प्रयत्नांमधून कांही विचारवंतांनी, समाज सुधारकांनी जातिसंस्थेचे शोषित व अन्यायकारक स्वरुप लोकांसमोर आणले. त्यामुळे व्यक्तीला उपेक्षेचे जीवन देणारी जातिसंस्था त्याज्य वाटू लागली. सर्व दुःखांचे मूळ जातिसंस्थेत आहे याची जाणीव झाली. जातिभेदाला कोणताही शास्त्रीय व बुध्दीला पटणारा आधार नाही ही वस्तुस्थिती समजली. जातिसंस्था समाजाच्या नैतिक व आर्थिक अधःपतनास जबाबदार आहे. त्यामुळे तिचा पुनर्विचार करण्याची व शक्य ते सर्व बदल घडवून आणण्याची आवश्यकता निर्माण झाली. या बुध्दीवादी वैचारिक मंथनातून प्रबो- धनाच्या युगाला सुरुवात झाली.

## जातिनिर्मूलनाविषयीचे सुरुवातीच्या सुधारकांचे विचार:

ब्रिटीशपूर्वकालात जातिसंस्थेचा विचार अनेक वेळा झाला असला तरी ब्रिटीशांच्या कालात जातिसंस्थेच्या चिकित्सेला खऱ्या अर्थाने महत्त्व प्राप्त झाले. ब्रिटीश राजवट भारतात स्थिर झाल्यानंतर ख्रिश्चन धर्मप्रचारक धर्मप्रसाराच्या हेतूने भारतात येऊ लागले. ख्रिश्चन धर्माच्या सार्वत्रिक प्रसाराच्या महत्त्वाकांक्षेने ख्रिस्ती धर्मप्रसारकांनी आपल्या कार्याला अत्यंत योजनाबध्द रितीने सुरुवात केली. ख्रिश्चन धर्माची महती व श्रेष्ठत्व पटवून देण्याबरोबरच हिंदू धर्मातील विकृती व दोष दाखवून देण्याचा प्रयत्न त्यांनी सुरु केला. या प्रयत्नामागे भारतात धार्मिक सुधारणा व्हावी व त्या अनुषंगाने सामाजिक सुधारणा व्हाव्यात, अशी सदिच्छा नव्हती. तर प्रचलित विकृत हिंदू धर्माच्या तुलनेने ख्रिश्चन धर्म कसा श्रेष्ठ व समताधिष्ठित आहे हे दाखवण्याचा त्यांचा हेतू होता. याच हेतूने त्यांनी हिंदू धर्माचे प्रमुख वैशिष्ट्य असलेल्या जातिसंस्थेवर कठोर असे वैचारिक हल्ले केले.

ख्रिस्ती धर्मप्रसारकांनी एकीकडे जातिव्यवस्थेचे शोषणप्रधान स्वरुप स्पष्ट केले तर दुसरीकडे जातिव्यवस्थेमुळे उपेक्षा व दारिद्र्य वाट्यास आलेल्या लोकांची सेवा करुन त्यांची सहानुभूती मिळविली. परिणामी अस्पृश्य वर्ग ख्रिश्चन धर्माकडे आकर्षित झाला. या आकर्षणातून अनेक लोकांनी हिंदू धर्माचा त्याग केला व ख्रिश्चन धर्माचा स्वीकार केला. त्यामुळे हिंदू धर्माला गळती लागली. या संकटामुळे महाराष्ट्रातीलच नव्हे तर संपूर्ण भारतातील विचारवंत, समाजसुधारक अंतर्मुख झाले. ख्रिस्ती धर्मप्रसारकांनी जातिसंस्थेची टीकात्मक चिकित्सा केल्यामुळे तिच्या पारंपारिक स्वरुपाविषयी वैचारिक संघर्ष निर्माण झाला. त्यातून समाजसुधारकांना व तत्त्वचिंतकांना जातिव्यवस्थेचे दोष जाणवू लागले. तिच्या दुष्परिणामांचे स्वरुप गंभीर व सर्वव्यापी असून व्यक्तीजीवन, समाजजीवन व राष्ट्रजीवन या दुष्परिणामांमुळे ग्रासल्याची जाणीव अनेकांना झाली.

या सर्वांचा परिणाम म्हणून अनेक विचारवंतांनी, सुधारकांनी व इतिहास संशोधकांनी वेदकालीन व तत्कालिन जातिव्यवस्थेच्या विश्लेषणाला सुरुवात केली. जातिसंस्थेचा उगम, विकास, तिचे स्वरूप व कार्य तपासून पाहिले जाऊ लागले. महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेर असे अनेक प्रयत्न सुरु झाले. महाराष्ट्रात लोकहितवादी, बाळशास्त्री जांभेकर, म. फुले, छ. शाहू महाराज, डॉ. आंबेडकर तर महाराष्ट्राबाहेर राजा राममोहनरॉय, केशवचंद्र सेन, भाई परमानंद या सर्वांनी सामाजिक सुधारणेत जातिभेद निर्मूलनाला अग्रक्रम दिला. या सर्वच सुधारकांच्या जातिभेद निर्मूलनाच्या कार्यक्रमाचे मध्यवर्ती सूत्र थोड्याफार फरकाने सारखे होते. त्यांच्या विचारांचा आशय असा होता की, ऐतिहासिक काळात व्यक्तीजीवनाचे एक स्वरूप व्यक्त करण्यासाठी जातिसंस्थेची निर्मिती झाली. "जात" या वैशिष्ठ्यपूर्ण घटकाने प्राचीन काळात समाजाला एकरूप ठेवण्याचे कार्य केले आहे. परन्तु नंतरच्या काळात मात्र जातिसंस्थेचे व जातिनिर्बंधाचे स्वरूप बदलत गेले व जातिसंस्था अधिक बंदिस्त बनत गेली. तिच्या बदललेल्या स्वरूपाचे परिणाम समाजसुधारकांनी अभ्यासले व त्यातून जातिभेद निर्मूलनाच्या प्रयत्नांना सुरुवात झाली. जातिभेद उच्छेदण्याचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून ब्राम्होसमाज, प्रार्थना समाज, सत्यशोधक समाज अशा अनेक संघटना निर्माण झाल्या व त्यातून सामाजिक सुधारणेची चळवळ मूळ धरु लागली. अशाप्रकारे इंग्रजी राजवटीत जातिव्यवस्थेच्या अनिष्ट व घातक रूढींचा, परंपरांचा पुनर्विचार करण्याचा प्रयत्न सुरुवातीच्या सुधारकांकडून झाला. याच काळात सुधारकांच्या कार्याने जातिसंस्थेच्या अनिष्ट स्वरूपाविषयी वेळोवेळी विचार मांडून वैचारिक क्रांतीची व परिवर्तनाची पार्श्वभूमी तयार केली.

जातिनिर्मूलनाच्या विविध चळवळी: दोन प्रवाह:

१९ व्या शतकात भारतात सामाजिक प्रबोधनाच्या दृष्टीने अनेक चळवळी

झाल्या. त्या सर्वांचा जातिभेदाला तत्वत: विरोध होता. परंतु त्याचे उच्चाटन करण्यासाठी त्यांनी अवलंबिलेल्या मार्गात पुष्कळच फरक होता. जातिभेदाची कालबाह्यता, अनिष्ट स्वरुप युक्तिवादाने व बुध्दीप्रामाण्याच्या आधारे पटवून देण्याचा व त्याआधारे परंपरानिष्ठ समाजात परिवर्तन करण्याचा प्रयत्न न्या. रानडे, आगरकर, लोकहितवादी आदि विचारवंतांचा होता. याउलट जातिसंस्थेच्या विकृत, व शोषण-प्रधान स्वरुपामुळे अन्याय सहन करावा लागला. अशा शूद्रातिशूद्रांना संघटित करुन प्रस्थापितांविरुध्द लढा देण्याची शिकवण देणारा व त्यांच्या नैसर्गिक हक्कांच्या प्राप्तीसाठी झगडणारा म. फुले, छ.शाहू, डॉ. आंबेडकर यांचा मार्ग होता.

महाराष्ट्रात जातिव्यवस्था व समाजसुधारणा यांच्या संबंधात विचार करणारे मुख्यत: तीन विचार प्रवाह होते . पहिला विचारप्रवाह हा उदारमतवादी लोकशाहीवादी नेमस्त सुधारकांचा होता. त्यात रानडे, गोखले, लोकहितवादी, भांडारकर, आगरकर, दादोबा पांडुरंग, भाऊ दाजी लाड वगैरे सुधारकांचा समावेश होतो. दुसऱ्या विचार-प्रवाहामध्ये लोकशाहीवादी विचार पुढे मांडून संपूर्ण जात्यंतासाठी संघर्ष करणाऱ्या जोतीराव फुले यांचा समावेश होतो. म. फुले यांच्या सत्य-शोधक व ब्राम्हणेतर विचार परंपरेत छ. शाहू महाराज, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे आणि इतर अनेक समाजसुधारकांचा समावेश होतो. याच सत्यशोधक विचारपरंपरेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचाही समावेश होतो. तिसरा प्रवाह हा जहाल राष्ट्रवाद्यांचा होता. त्यात चिपळूणकर, लो. टिळक, इतिहासाचार्य वि.का. राजवाडे, ज्ञानकोषकार श्री.व्यं. केतकर आणि इतर विचारवंतांचा समावेश होतो. त्यांच्याच परंपरेत स्वातंत्र्यवीर वि.दा. सावरकर यांचा समावेश करावा लागतो. पण सावरकरांच्या विचारांवर आगरकरादि सुधारणावादी विचारांचाही प्रभाव पडलेला होता. या सर्व विचारप्रवाहांचा क्रमश: परामर्श घेणे आवश्यक आहे.

उदारमतवादी विचारप्रवाह:

उदारमतवादी नेमस्त विचारवंतांनी सुधारणावादाचा पुरस्कार केला. त्यात प्रामुख्याने राजारामशास्त्री भागवत, गोपाळ गणेश आगरकर, म.गो. रानडे, लोकहितवादी यांचा समावेश होतो. या सर्व विचारवंतांनी समाजसुधारणेचा जो पहिला शत्रू अंध आचार धर्म त्यावर टीका केली. अंधआचार धर्माइतकीच हिंदू समाजरचनेच्या मुळाशी असलेली विषमता समाजसुधारणेच्या मार्गातील अडथळा आहे असे या सर्वांचे मत होते.

आगरकरांनी उदारमतवादी दृष्टिकोनातून हिंदू समाजाच्या स्थितीची मीमांसा केली. आगरकरांना प्राचीन हिंदू संस्कृतीचा रास्त अभिमान होता. परन्तु हिन्दू समाजाची सद्यस्थिती निराशाजनक आहे. तिला एक प्रकारची शिलावस्था प्राप्त झालेली आहे. जातिसंस्थेसारख्या दोषामुळे गेल्या हजारो वर्षांत विलक्षण अधःपात झाला आहे. आगरकरांच्या मते, आपली सामाजिक परंपरा ज्या तत्वावर आधारलेली होती ती आता कालबाह्य झाली आहे.[१०] अशा स्थितीप्रिय समाजाचा उत्कर्ष होण्यासाठी काय केले पाहिजे हे त्यांनी अनेक लेखांमधून सांगितले आहे. "सुधारक" या वृत्तपत्रातूनही त्यांनी या विषयावर विपुल लेखन केले आहे.

प्राचीन हिंदू समाज चातुर्वर्ण्यव्यवस्थेवर आधारलेला होता. या चार वर्णांमधून नंतरच्या काळात हजारो जाती निर्माण झाल्या. ही जातिसंस्थेची उत्पत्ती आगरकरांना मान्य नाही. इतकेच नव्हे तर मानवी इतिहासाच्या कोणत्याही कालखंडात अशी स्थिती नव्हती. तर समाजातील उच्चवर्गाने आपल्या स्वार्थासाठी चातुर्वर्ण्य व्यवस्थेला जन्म दिला व तिला हिंदू धर्मशास्त्रांचा आधार असल्याचा प्रचार केला, असे त्यांचे मत होते.[११] "सोवळयाओवळयाची पुरवणी" या लेखात जातिय विषमतेविषयी आगरकर म्हणतात, "समाजाच्या विलक्षण रहाटीमुळे

उच्च-नीचत्व अस्तित्त्वात येऊन तद्नुसार जो व्यवसाय विभाग सहजगत्या झाला आहे, त्यास ईश्वरकृत मानून उच्च वर्गात जन्मास आलेल्या लोकांनी नीच वर्गात जन्मास आलेल्या लोकांस अपवित्र व अस्पृश्य मानणे याहून मनुष्याच्या विचारीपणास लांछनास्पद अशी दुसरी गोष्ट नाही."[१२]

हिंदू समाजातील जातिभेद व वर्णभेद मानीत असल्यामुळे वर्णसंकर घडू देणे त्यांना हितावह वाटत होते. वर्णसंकर ही धर्मग्लानि आहे, असे मानणाऱ्या कर्मठ लोकांना आगरकर सांगतात "वर्णसंकरे होऊन पाहिजे त्याला पाहिजे त्याच्याशी अन्नोदकव्यवहार करण्याची किंवा लग्न करण्याची परवानगी असणे - वगैरे गोष्टी प्रचारात आल्यास कोणत्याही प्रकारची धर्मग्लानि होणार आहे, असे आम्हास वाटत नाही."[१३] अशाप्रकारे हिंदू धर्मातील वर्ण व जातिभेदासारख्या वाईट प्रथा दूर होऊन मूळच्या आदर्श धर्माचे पुनरुज्जीवन व्हावे असे त्यांना वाटत होते. या दृष्टिकोनातून त्यांनी समाजसुधारणेविषयीचे विचार मांडलेले आहेत. त्यांच्या सर्व सुधारणावादी विचारांचा मुख्य आधार व्यक्तीस्वातंत्र्य हा होता. म्हणून जन्मसिध्द चातुर्वर्ण्य पध्दती ही व्यक्ती स्वातंत्र्याच्या तत्त्वाशी विसंगत असल्याने त्यांना ती मान्य नव्हती. ही जातिव्यवस्था विचारस्वातंत्र्य, विवाहस्वातंत्र्य व वृत्तीस्वातंत्र्य यांच्या विरोधी आहे आणि व्यक्तीस्वातंत्र्याअभावी व्यक्तीचा विकास होऊ शकणार नाही अशी त्यांची धारणा होती. यास्तव त्यांनी जन्मनिष्ठ जाती व वर्णप्रथेला विरोध केला.

आगरकरांच्या परंपरेतील न्या. महादेव गोविंद रानडे यांचे जातिभेदाविषयीचे विचार अभ्यासपूर्ण असे आहेत. त्यांच्या मते मूळातच जातिसंस्था संकुचित अभिमानाच्या व विषमतेच्या कल्पनेवर आधारलेली आहे. सर्व मनुष्यप्राण्यांचे हितसंबंध समान असताना वेगवेगळे वर्ण कल्पून कृत्रिम भेद

निर्माण करण्याच्या सवयीतून जातिसंस्थेची निर्मिती झालेली आहे. असे असले तरी एकेकाळी सार्‍या समाजाची सुव्यवस्था लावण्याचे जातिसंस्था हे एक साधन होते.[१४] मात्र ही सुव्यवस्था लावताना गुण, कर्म व कौशल्य याचा विचार केला गेला नाही. तर प्रत्येक मनुष्यप्राण्याला अगदी जन्मापासून पूर्वनियोजित अशा समाजव्यवस्थेच्या चौकटीत बसवून टाकण्याची कल्पना जातिसंस्थेत होती. त्यामुळे या जीर्ण संस्थेची धोंड प्रगतीस व स्थैर्यास अडथळा करु लागली.[१५] रानडे यांना जातिसंस्थेचे अनिष्ट परिणाम सामाजिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रात जाणवले. "हिन्दी समाजाच्या आर्थिक, सामाजिक व राजकीय संघटनेच्या उपक्रमात जातिसंस्था फार दिवसांपासून कुचकामी ठरली आहे."[१६] असा त्यांचा निष्कर्ष होता.

सर्व वर्ण व पंथ समाजदृष्टया समान असल्यामुळे त्यांच्यामध्ये असलेली विषमता मोडून काढण्यासाठी जातिभेद निर्मूलनाची गरज रानडे यांना वाटत होती. परंतु या संदर्भात त्यांनी क्रमाक्रमाने सुधारणा करण्याचा मार्ग पसंत केला आणि परंपरा व परिस्थिती यांचा समन्वय साधण्याचा विचार मांडला.

लोकहितवादी उर्फ गोपाळ हरि देशमुख हे महाराष्ट्रातील समाजसुधारणेच्या आंदोलनातील एक अग्रणी मानले जातात. सामाजिक विषमता, जातिभेद निर्मूलन, जातिबंधाने याविषयी त्यांनी वेळोवेळी सुधारणावादी विचार मांडले आहेत. जातिभेद, वर्णव्यवस्था हिंदूधर्माच्या अपकर्षास जबाबदार आहे, असे इतरांप्रमाणे त्यांचेही मत होते. जन्मनिष्ठ चातुर्वर्ण्य किंवा जातिभेद हा दैववादाचा परिणाम असून तो हिंदू धर्माचे यथेच्छ शोषण करीत आहे असे त्यांचे मत होते. या जन्मजात जातिभेदाने समाजाच्या चिरफळ्या केल्या. एकोपा नाहिसा केला. बुध्दीचा पराक्रम खुंटविला अशी खंत लोकहितवादींना वाटत होती.[१७] जातीजातीतील भेदामुळे हिंदू समाज नवीन विद्येला, ज्ञानाला पारखा झाला आहे, असे त्यांना वाटत होते.

हिंदू समाजाच्या हिताच्या दृष्टीने जातिसंस्था घातक असली तरी जाती व वर्णसंस्था समूळ उच्छेदण्याची कल्पना त्यांना मान्य नव्हती. जाती व वर्णव्यवस्थेत त्यांनी फरक केला आहे. श्रमविभागणीसाठी व समाजाच्या नियमनासाठी वर्णव्यवस्था आवश्यक असली तरी जातीसंस्था असावीच असे मात्र त्यांना वाटत नव्हते. तसेच वर्णसंस्था ही जन्मनिष्ठ नसावी तर ती गुण व कर्म यानुसार निश्चित होणारी असावी असे त्यांना वाटत होते. जाती-उपजाती कधी नष्ट होणार नाहीत हे त्यांनी मान्य केले. परन्तु जाती-जातींनी आपला संकुचित जातिभिमान सोडावा, असे मात्र त्यांना वाटत होते.

जाती-जातींमधील फूट मोडावी, समाज संघटित व बलिष्ठ व्हावा व त्यासाठी श्रेष्ठ-कनिष्ठ भेद लयाला नेणारी समता नांदावी, जातींनी आपल्या जन्मजात मोठेपणाच्या कल्पना सोडून द्याव्यात, अशी भूमिका त्यांनी "शतपत्रां"मधून व्यक्त केली आहे. थोडक्यात, संकुचित अर्थाने धर्मशास्त्र व सामाजिक रूढी यांच्यापलीकडे पाहण्याची दृष्टी जशी लोकहितवादींना होती तसेच सामाजिक विषमतेच्या आधाराचे मूळ शोधण्याचा प्रयत्न लोकहितवादींनी केला.[१८]

रानडे, आगरकर, लोकहितवादी यांच्या उदारमतवादी विचारांमुळे जातिभेदनिर्मूलन करण्याची आवश्यकता वाटू लागली. तरी त्यांनी जातिभेद निर्मूलनासाठी कोणतीही व्यापक चळवळ हाती घेतली नाही. या सर्व सुधारकांनी सुधारणेचा आग्रह धरला असला तरी त्यांचा सुधारणावाद रूढीभंजन, जाती व वर्णविरहीत अशा समताधिष्ठित समाजरचना यासारख्या अधिक व्यापक प्रश्नांना जाऊन भिडला नाही. जातिनिर्मूलनाच्या कार्याला उच्चवर्णीय सुधारकांचा फारसा हातभार लागला नाही. त्यामुळे परंपरा निष्ठेचे व पुनरुज्जीवनवादाचे प्रस्थ वाढले.[१९]

सत्यशोधक विचारप्रवाह:

जातिव्यवस्थेच्या मीमांसेत ब्राह्मणेतर विचारप्रवाहाचे योगदानही महत्त्वपूर्ण आहे. प्राचीन काळी कनिष्ठ वर्गाला शिक्षणाचा हक्क नसला तरी इंग्रजी सत्तेची स्थापना झाल्यानंतर ब्राह्मणेतर वर्गालाही शिक्षणाची संधी उपलब्ध झाली. त्यामुळे शिक्षण घेतलेल्या सुशिक्षितांचा नवा वर्ग समाजात तयार झाला. हा नवा वर्ग जातिभेद, स्त्रीप्रामाण्य, विषम समाजव्यवस्था याकडे बुध्दीवादी दृष्टीकोनातून पाहू लागला. त्यापूर्वी ब्राह्मणी विचारप्रवाहाने जातिसंस्थेचे परीक्षण केले होते. परन्तु ब्राह्मणी संप्रदायातील जातिमीमांसेवर भोवतालच्या धार्मिक सनातनीपणा, धर्मश्रध्दा, रुढी यांचा मोठा प्रभाव होता. या प्रभावामुळे ब्राह्मणी संप्रदायातील जातिमीमांसेवर अनेक मर्यादा पडल्या होत्या. परन्तु ब्राह्मणेतर विचारप्रवाहाने पारंपरिक प्रभावाच्या चौकटीत सापडलेली जातीमीमांसा मुक्त करण्याचा प्रयत्न केला. या वर्गाची जातिमीमांसा अधिक वस्तुनिष्ठ व व्यापक होती. म. फुले, विठ्ठल रामजी शिंदे, छ. शाहू महाराज, डॉ. आंबेडकर यांनी ब्राह्मणेतर वर्गाची जातिमीमांसा मार्गदर्शित केली आहे.

ब्राह्मणेतर जातिमीमांसा वस्तुनिष्ठ बनवण्याचा प्रयत्न सर्वप्रथम म.फुले यांनी केला. महाराष्ट्रातील ब्राह्मणेतर चळवळीचे ते आद्यपुरस्कर्ते असून सामाजिक चळवळीला सामाजिक विद्रोहाचे स्वरुप प्राप्त होण्यास त्यांच्या सत्यशोधक समाजाची विचारसरणी कारण झाली, असे म्हणता येईल.[२०] त्यांनी जातिभेदाला विरोध करण्याबरोबरच विद्येच्या क्षेत्रातील उच्चवर्णीयांची मक्तेदारी तसेच सामाजिक व धार्मिक क्षेत्रातील त्यांचे वर्चस्व यावर त्यांनी हल्ला चढविला आणि स्वत:च्या हक्कासाठी लढा देण्यास शूद्रातिशूद्रांना प्रवृत्त केले. म. फुले क्रांतिकारी विचारांचे

क्रियाशील सुधारक होते. त्यांनी सामाजिक समतेच्या दृष्टीकोनातून पुरोहितशाही, वर्णवर्चस्व, स्त्रीप्रामाण्य, अस्पृश्यता यावर टीका केली. फुले यांच्या काळात जातिमीमांसा अधिक परिवर्तनवादी बनली. फुले यांनी तत्कालिन समस्यांचा वेध अत्यंत वेगळ्या पध्दतीने घेतला. त्यांच्या कार्यामागे धर्मसुधारणेऐवजी धर्मविषयक कल्पनेत आमूलाग्र बदल घडवून आणण्याची प्रेरणा होती.[२१] समाजाची धारणा करणारा धर्म सहजासहजी बदलता येत नाही. त्यामुळे आहे त्या धर्मात सुधारणा करण्याचा मार्ग त्यांनी अनुसरला. त्यासाठी अस्पृश्यता, जातिभेद यांचा धर्माशी असलेला संबंध तोडण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

म. फुले यांनी दलितोद्धार व सामाजिक तसेच आर्थिक गुलामगिरीही नष्ट करणे या कार्यावर विशेष भर दिला. पुरुषसूक्तातील व मनुस्मृतितील जाती-वर्णव्यवस्थेच्या निर्मितीसंबंधीचा ईश्वरी सिध्दांत फुले यांनी नाकारला व ऐतिहासिक विकासक्रमात राजकीय तसेच आर्थिक हितसंबंध सुरक्षित ठेवण्यासाठी जाती व वर्णव्यवस्था ब्राह्मणांच्या कसबातून कशी निर्माण झाली हे त्यांनी इतिहासाच्या आधारे स्पष्ट केले.[२२] जन्मनिष्ठ उच्चनीच भेद ईश्वरी इच्छेने किंवा माणसाच्या पूर्वकर्माने निर्माण झाले आहेत, या समजूतीला त्यांनी धक्का दिला आणि एकंदर सामाजिक व्यूहरचना शोषक व शोषित, उच्चवर्णीय आणि शूद्रातिशूद्र यांच्यातील आंतर्विरोधावर कशी आधारलेली आहे, हे त्यांनी दाखवून दिले. "गुलामगिरी" व "सार्वजनिक सत्यधर्म" या ग्रंथांमधून त्यांनी शोषणमुक्त अशा नव्या समताधिष्ठित समाजाचा विचार मांडला.

म. फुले यांचे कार्य कोल्हापूरचे छ. शाहू महाराज यांनी जोमाने पुढे चालवले. गेल्या काही दशकात महाराष्ट्रात सामाजिक, धार्मिक व शैक्षणिक क्षेत्रात जे स्थित्यंतर घडून आले त्याचे श्रेय काही प्रमाणात शाहू महाराजांच्या प्रेरणेने सुरु झालेल्या प्रबोधनाच्या चळवळीला द्यावे लागेल. सत्यशोधक

समाज व आर्यसमाजी विचारांचा समन्वय छ. शाहू महाराजांच्या विचारामध्ये झालेला आहे. ते जातिव्यवस्थेचे कडवे विरोधक होते. त्यांनी जातिभेद आणि ब्राह्मणांच्या सर्वंकष वर्चस्वाला विरोध केला. जातिभेदामुळे समाज संघटनेचे व राष्ट्रनिर्मितीचे कार्य मागे पडले आहे. हे जाणून त्यांनी महाराष्ट्रात ब्राह्मणेतर चळवळीला प्रोत्साहन व पाठिंबा दिला. अस्पृश्यता निवारण व दलितोद्धाराच्या दृष्टीने विविध जातींच्या लोकशाहीवादी चळवळींना उत्तेजन दिले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे म. फुले यांना गुरु मानीत. त्यांच्या कार्यावर छ. शाहू महाराजांच्या कार्याचाही प्रभाव होता. १९१९ च्या माणगाव परिषदेत शाहू महाराजांनी आंबेडकरांना दलितांचे नेतृत्व स्वीकारण्याचे आवाहन केले.[२३] डॉ. आंबेडकरांनी जातिव्यवस्थेचा शास्त्रीय अभ्यास करुन भारताच्या खऱ्या विकासासाठी जातिनिर्मूलन आवश्यक आहे, असे मत मांडले व पुढे आयुष्यभर जातीभेदाविरुद्ध लढा दिला.

अनुदार जहाल राष्ट्रवादी विचार प्रवाह:

आधुनिक महाराष्ट्रातील जातिमीमांसेचा विचार प्रवाह सामाजिकदृष्टया अनुदार भूमिका स्वीकारणाऱ्या जहाल राष्ट्रवादी विचारवंतांचा होता. त्यात स्वत: चिपळूणकर, लो. टिळक, इतिहासाचार्य वि.का. राजवाडे, ज्ञानकोशकार केतकर यांचा समावेश होतो. या सर्वांना ब्राह्मण्याचा जाज्वल्य अभिमान होता. प्राचीन भारताची समाजरचना श्रेष्ठ होती असे त्यांचे मत होते. चिपळूणकरांनी आपल्या "केसरी"तील लेखात जातिव्यवस्था राष्ट्रैक्यास मारक आहे[२४] असे म्हटलेले होते. टिळकांनाही ते पटलेले होते. पण आपल्या प्राचीन वारश्याबाबतचे त्यांचे पूर्व गौरववादी विचार आणि ब्राह्मण जातीच्या पाठिंब्यावर उभे असणारे त्यांचे नेतृत्व यामुळे त्यांनी सरळ सरळ जातिसंस्थेविरुद्ध भूमिका घेतली नाही.

लोकमान्य टिळकांनी जातिनिर्मूलनाचा विचार राष्ट्रबांधणीच्या दृष्टीकोनातून मांडला आहे. राष्ट्रसंघटनेच्या मार्गातील एक अडसर म्हणून त्यांनी जातिसंस्थेचा विचार केला. स्वत: टिळक हिन्दू धर्माचे त्यातही सनातन वैदिक पंथाचे अभिमानी होते.[२५] आपल्या परंपरेच्या श्रेष्ठत्वाची जाणीव, तिचा सार्थ अभिमान ही एक राष्ट्रीयत्वाची संजीवनीच होय असे त्यांना वाटत असे. असे असले तरी सद्यस्थितीत हिन्दू धर्माला उतरती कळा लागली आहे व तिचे कारण जातिभेद व संकुचित जातिनिष्ठा होय, असे त्यांनी सांगितले. परन्तु त्यांना चातुर्वर्ण्य व्यवस्था मान्य होती. मात्र त्यांना मान्य असलेले चातुर्वर्ण्य गुणकर्मनिष्ठ असे होते. १९१६ साली कानपूरच्या व्याख्यानात त्यांनी हे स्पष्ट केले की, "हिन्दू समाजाला शास्त्रातील चातुर्वर्ण्य मान्य आहे, पण ते आनुवंशिक नाही."[२६]

जातिभेद, अस्पृश्यता या रुढी टिळकांना मान्य नव्हत्या. तसेच जन्मनिष्ठ व विषमतामूलक चातुर्वर्ण्य त्यांना मान्य नव्हते. शुध्दीचा त्यांनी पुरस्कार केला. धर्म परिवर्तनाचा आग्रह धरला. वेदांचे प्रामाण्य व वेदांचे अपौरुषेयत्व त्यांना मान्य नव्हते. शंकराचार्यांच्या गीताभाष्याचे खंडन करून हजारो वर्षांचे हिन्दू मनावर असलेले त्यांचे वर्चस्व टिळकांनी नष्ट केले.[२७]

परन्तु याचा अर्थ टिळकांनी समाजव्यवस्थेत आमूलाग्र बदल करण्याचा विचार मांडलेला नाही. तर जुनी धर्मतत्त्वे, जुने आचार यांची बदलत्या कालानुसार पुनर्रचना केली पाहिजे व त्यांना कार्यक्षम बनवले पाहिजे, असे त्यांचे धोरण होते.[२८] थोडक्यात जाती, वर्ण व धर्मविरहित अशा समाजाची कल्पना त्यांनी मांडलेली नाही. तर सर्व धर्म, पंथ, जाती-जमाती या सर्वांचेच एक राष्ट्र त्यांना घडवायचे होते. त्या सर्वांना राष्ट्रसंवर्धनासाठी एक समान सूत्रात बांधण्याचा प्रयत्न त्यांनी केला.

इतिहासाचार्य राजवाडे यांचेही या संदर्भातील विचार व्यवहारवादी आहेत. जातिसंस्थेचे मूळ शोधण्यापेक्षा व तिच्या दुष्परिणामांचा परामर्श घेण्यापेक्षा जातिव्यवस्थेने निर्माण केलेल्या समाजरचनेची उपयुक्तता त्यांना जास्त महत्त्वाची वाटते.[२९] राजवाड्यांच्या मते पाणिनीच्या काळात चार वर्ण समाजात होते. परंतु जातींची निर्मिती झालेली नव्हती. त्यांच्या मते, नंतरच्या काळात वर्णव्यवस्थेतून जातिव्यवस्थेची निर्मिती होण्याचे कारण म्हणजे अनुलोम व प्रतिलोम विवाहपद्धती होय.[30] या विवाहपद्धतीतून विविध संकरजाती निर्माण झाल्या. या जातींना वेग-वेगळ्या वृत्ती व उपजीविकेची साधने देण्यात आली. त्यामुळे वर्णसंकर व वृत्तीसंकर टळला, अशी जातिसंस्थेची उत्पत्ती राजवाडे यांनी सांगितली आहे.[३१] या दृष्टीने जातिसंस्था सर्वांना उपकारक आहे, असा त्यांचा युक्तिवाद आहे. थोडक्यात बीजक्षेत्रशुध्दी, वंशशुध्दी, समान संस्कृती व वृत्ती हे जातिसंस्थेचे मूळ आधार राजवाड्यांनी सांगितले आहेत.

हिंदुस्थानच्या उन्नतीच्या राष्ट्रवादी जाणीवेतून त्यांचे जातिविषयक विचार निर्माण झाले आहेत. राजवाड्यांनी जातिसंस्थेचे समर्थन केले असले तरी कालानुसार त्यांच्या विचारात काहीसे परिवर्तन घडून आले. नंतरच्या काळात जाती व वर्ण नष्ट करून एकवर्णी समाज निर्माण करण्याची कल्पना त्यांनी मान्य केली. जातिसंस्थेचे अस्तित्त्व व आवश्यकता मान्य करीत असता-नाच एकजिनसी हिंदू समाज निर्माण झाला पाहिजे,[३२] असेही त्यांना वाटते. म्हणूनच आयुष्याच्या अखेरच्या काळात मानववंशाचा संकर आणि आनुवंशिक वृत्तीचे उल्लंघन या दोन्ही दृष्टीने चातुर्वर्ण्यव्यवस्था आज टिकू शकत नाही, इतकेच नव्हे तर त्याहून श्रेष्ठ अशी समाजरचना निर्माण करण्याचा काळ आला आहे, या विचाराप्रत राजवाडे आले.[३३]

ज्ञानकोशकार डॉ. श्री.व्यं. केतकर जातिसंस्थेकडे बुध्दीवादी दृष्टीने पाहतात. आपल्या पूर्वजांनी प्राचीन काळी जातिसंस्था स्वीकारली त्याअर्थी

ती चांगली असली पाहिजे हे त्यांनी अमान्य केले. प्रचलित समाजरचनेत बदल करावयाचे असतील तर ते एकतर परंपरासंमत मार्गाने करावे लागतील किंवा परंपरापतित मार्ग अवलंबता येतील. अशी जातिव्यवस्थेच्या स्वरूपात कोणत्याही मार्गाने बदल करण्याची भाषा केतकर वापरत असले तरी चातुर्वर्ण्य पध्दतीला धक्का लावण्याची त्यांची इच्छा नव्हती. सामाजिक क्रांती, समाजपरिवर्तन करण्यापेक्षा त्यांना परंपरेच्या चौकटीत राहून जाति-व्यवस्थेत बदल करण्याच्या प्रयत्नांवर त्यांचा विशेष भर होता.

"जात" या नावाने ओळखल्या जाणाऱ्या सामाजिक गटाचे सदस्यत्व जन्माधिष्ठित असते. या गटातील सदस्यांना गटाबाहेरच्या व्यक्तीशी विवाह करण्याची मनाई केलेली असते, अशी जातीची व्याख्या केतकरांनी केलेली आहे. श्रेणीबध्द समाजरचना ही सर्वत्र आढळणारी नैसर्गिक स्थिती आहे.[३४] असे त्यांना वाटत होते. त्यामुळे हिन्दू समाजातील विषमतेवर त्यांनी कधी प्रहार केले नाहीत. तरीही जातिभेद मोडावयाचा विचार त्यांनी मांडला तो विषमता वाईट म्हणून नाही तर "आपल्या देशातील सर्व लोकांचे एकीकरण करून आमचे एक बलवान राष्ट्र करावयाचे व हिंदुस्थानचे महत्त्व आम्हास जगात वाढवावयाचे"[३५] या भूमिकेतून. "आपल्या राष्ट्र-धर्माच्या आड जातिधर्म येतो व त्याकरिताच तो मोडला पाहिजे."[३६] असे ते म्हणात.

राजवाडे व केतकर यांच्याप्रमाणेच बॅ. वि.दा. सावरकर यांनीही राष्ट्रवादी भावनेतून जातिनिर्मूलनाविषयी विचार मांडले आहेत. त्यांचे जातिभेदनिर्मूलनाविषयीचे विचार संघटित व सबळ हिन्दू राष्ट्राच्या निर्मि-तीच्या कल्पनेशी निगडीत होते. एकात्म हिन्दू राष्ट्राच्या निर्मितीतील एक समस्या या दृष्टीने त्यांनी जातिव्यवस्थेचा विचार केला आहे. गुण व कर्मनिष्ठ जातिव्यवस्था त्यांनी व्यापक दृष्टीकोनातून मान्य केली आहे.

राष्ट्रवादी संप्रदायाच्या जातिव्यवस्थेच्या वैचारिक चिकित्सेतून असे लक्षात येते की, या वैचारिक चिकित्सेने जातिसंस्थेच्या अनिष्ठ स्वभावर प्रहार केले असले तरी जातिभेदाच्या समूळ निर्मूलनाचा विचार राजवाडे, केतकर यांनी मांडला नाही. जातिव्यवस्थेतील दोष, विकृति दाखवित असतानाच तिची आवश्यकता व उपयुक्तता स्पष्ट करण्याचाही प्रयत्न

असतानाच तिची आवश्यकता व उपयुक्तता स्पष्ट करण्याचाही प्रयत्न त्यांच्याकडून झाला. म्हणूनच या वर्गाकडून जातिभेदाचे समूळ उच्चाटन करण्याचे कार्य कधीच हाती घेतले गेले नाही. तर जातिसंस्थेत परिस्थितीनुसार कांही बदल करण्याचे बचावात्मक प्रयत्न झाले. तसेच त्यांचे जातिसंस्थेच्या विषम व शोषणप्रधान आर्थिक पायाकडेही लक्ष गेले नाही. त्यामुळे समताधिष्ठित समाजरचनेची कल्पना त्या काळात निर्माण होऊ शकली नाही. अशाप्रकारे अनुदार जहाल राष्ट्रवादी विचार प्रवाहाच्या अनेक वैचारिक व व्यावहारिक मर्यादा जाणवतात.

## संशोधनाचा उद्देश व अभ्यासपध्दती:

बॅ. वि.दा. सावरकर यांची तुरुंगातून सुटका झाल्यानंतर त्यांनी सबल हिंदूराष्ट्राच्या निर्मितीसाठी जातिसंस्थेचे निर्मूलन करणे आवश्यक आहे, असे मत मांडले. त्यासाठी त्यांनी त्यांचे प्रसिध्द असे "जात्युच्छेदक निबंध" लिहिले. जातिसंस्थेला त्यांनी विरोध केला. याच काळात डॉ.आंबेडकरांनी जातिसंस्थेविरूध्द विशेषत: अस्पृश्यतेविरूध्द अनेक लढे पुकारले आणि त्यासाठी त्यांनी "जातिसंस्थेचे निर्मूलन" (Annihilation of Caste) सारखा प्रखर निबंध लिहिला. प्रस्तुत प्रबंधात बॅ. वि.दा. सावरकर आणि डॉ. भी.रा. आंबेडकर यांच्या जातिनिर्मूलनविषयक विचारांचा तुलनात्मक अभ्यास करण्यात आला आहे. हा तुलनात्मक अभ्यास ऐतिहासिक दृष्टीकोनातून करण्यात आला असून सावरकर व आंबेडकर यांचे विचार

त्यांच्या एकूण सामाजिक व राजकीय विचारांच्या संदर्भात तपासले आहेत. प्रस्तुत अभ्यासात सावरकर व आंबेडकर यांच्या समग्र जातिनिर्मूलनविषयक साहित्याची तुलना अभिप्रेत नाही तर मुख्यत: हा अभ्यास "जात्युच्छेदक निबंध" आणि "जातिनिर्मूलनाचे कार्य" या दोन निबंधाना मध्यवर्ती कल्पून करण्यात आलेला आहे. अभ्यासपध्दती ही या दोन निबंधांचे स्पष्टीकरण व विवरण (Textual Exegsis) करणारी असल्यामुळे मुख्य भर त्यांच्या लिखाणावरच आहे.

...........

## प्रकरण पहिले

## विषय-प्रवेश

१. मराठी विश्वकोश-खंड २रा, पृष्ठ क्र. ३९८.

२. जोशी लक्ष्मणशास्त्री - लेखसंग्रह खंड १, पृ.क्र. ३४७.

३. बोबडे प्रकाश - भारतीय समाजरचना: पारंपरिक व आधुनिक पृ.क्र.२३७.

४. माटे श्री.म.-विचार शलाका (जातीच्या हरळीचे मूळ) पृ.क्र. २८.

५. उक्त पृ.क्र. २८.

६. उक्त पृ.क्र. २९.

७. सरदार गं.बा.-संतवाङ्मयाची फलश्रुती, पृ.क्र.

८. डांगे श्री.अ.-बारा भाषणे-अभिनव प्रकाशन, मुंबई १९७६.

९. मराठी विश्वकोश,-खंड २, पृ.क्र. ३९८.

१०. सरदार गं.बा.-प्रबोधनातील पाऊलखुणा पृ.क्र. ६९
(संपा) निर्मलकुमार फडकुले.

११. डॉ. सहस्त्रबुद्धे पु.ग.-केसरीच्या त्रिमूर्ती पृ.क्र. १७९.

१२. उक्त पृ.क्र. १३६ व १३७.

१३. उक्त पृ.क्र. १७९

१४. कर्वे द.गो.-स्वतंत्र भारताचे द्रष्टे: न्या. रानडे पृ.क्र. ४५.

१५. उक्त पृ.क्र. ४०.

१६. उक्त पृ.क्र. ४४-४५.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

१७. फाटक न.र.-अर्वाचिन महाराष्ट्रातील सहा थोर पुरूष, पृ.क्र. १४.

१८. जावडेकर शं.द. - आधुनिक भारत, पृ.क्र. १००.

१९. सरदार गं.बा.- प्रबोधनातील पाऊलखुणा, पृ.क्र. ७५.
(संपा. निर्मलकुमार फडकुले)

२०. जावडेकर शं.द. - आधुनिक भारत, पृ.क्र. १०१.

२१. सरदार गं.बा. प्रबोधनातील पाऊलखुणा, पृ.क्र. १२४.
(संपा. निर्मलकुमार फडकुले)

२२. महाराष्ट्रातील जातिसंस्था विषयक विचार, पृ.क्र. १७.
(सं.) यशवंत सुमंत, दत्तात्रय पुंडे प्रस्तावना -

२३. दावरे रमेश - माणगाव परिषद, हिरक महोत्सव स्मरणिका,
कोल्हापूर, १९८४.

२४. चौसाळकर अशोक - "विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या विचारांचे
स्वरूप - नवभारत - जानेवारी १९८७.

२५. डॉ. सहस्रबुध्दे पु.ग. - केसरीच्या त्रिमुर्ती - पृ.क्र. २२१.

२६. उक्त पृ.क्र. २९८.

२७. उक्त पृ.क्र. २३६.

२८. उक्त पृ.क्र. २४९.

२९. डॉ. अरविंद देशपांडे - इतिहासाचार्य वि.का. राजवाडे (१)
१८६३-१९२६ सुमंत आणि पुंडे (सं) महाराष्ट्रातील जातिसंस्था-
विषयक विचार, पृ.क्र. ६५.

३०. डॉ. अरविंद देशपांडे - इतिहासाचार्य वि.का. राजवाडे (१) १८६३-१९२६ सुमंत आणि पुंडे (सं) महाराष्ट्रातील जातिसंस्था-विषयक विचार, पृ.क्र. ६६.

३१. डॉ. अशोक चौसाळकर - उक्त पृ.क्र. ७५.

३२. उक्त पृ.क्र. ८२.

३३. जावडेकर शं.द.-आधुनिक भारत पृ.क्र. २०९.

३४. फडके य.दि.- व्यक्ती आणि विचार पृ.क्र. ८९.

३५. उक्त पृ.क्र. ९३ व ९४.

३६. उक्त पृ.क्र. ९३ व ९४.

...........